ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख ५ सप्टेंबर, १९५१ अंक ३६

## विविध माहिती

**तेलाची टंचाई व भारत**—आबादानमधील तेलाचा पुरवठा पुरेसा होत नसल्यामुळें भारताच्या खर्चांत वाढ झाली आहे. कमी पडणारा पुरवठा अमेरिकेकडून विकत घेण्यासाठीं भारताला दरवर्षी सुमारें १५ ते १८ कोटी रुपये जास्त खर्च करावे लागणार आहेत असें समजतें. आधींच भासणारी डॉलर्सची टंचाईची परिस्थिति ह्यामुळें अधिकच तंग होण्याचा संभव आहे.

**जर्मनीकडून रेल्वेचीं एंजिनें**—भारतानें प. जर्मनीच्या कारखानदारांकडून १३५ रेल्वे एंजिनें विकत घेण्याचें ठरविलें आहे. हीं एंजिनें ब्रिटिश व अमेरिकन नमुन्याप्रमाणें तयार करण्यांत येणार आहेत. पहिलें एंजिन भारताचे प. जर्मनींतील प्रतिनिधी श्री. प्रेमकिशन ह्यांच्या हवालीं नुकतेंच करण्यांत आलें. १९५१ मध्यें भारताला २० एंजिनें मिळतील आणि बाकीचीं १९५२ सालीं मिळतील.

**ब्रिटिश रेल्वे कामगारांची मागणी**—पांच लाख ब्रिटिश रेल्वे कामगारांनीं आपल्या पगारांत शेकडा १० टक्के वाढ व्हावी अशी मागणी केली आहे. ह्या कामगारांत स्टेशन मास्तरपासून पोर्टरपर्यंत सर्व दर्जाचे कामगार आहेत. ही मागणी पुरी करावयाची तर १·६ कोटी पौंडांचा खर्चाचा जास्त बोजा ब्रिटिश रेल्वे कंपन्यांना स्वीकारावा लागेल.

**मुंबईत स्त्रियांची संख्या अधिक**—भारतामधील औद्योगिक शहरांमधून पुरुषांची संख्या स्त्रियांपेक्षां कमी असल्याचें नुकत्याच झालेल्या खानेसुमारींत आढळून आलें आहे. कलकत्त्याला दर हजार पुरुषामागें ५७१ स्त्रिया असें प्रमाण पडतें. मुंबईतील हें प्रमाण ५९७ आहे. कानपुरांत ७०० आणि अहमदाबादेंत ७६४ आहे. नवी दिल्लीचें प्रमाण ६८० आहे. मद्रास राज्यांतील राजमहेंद्री शहरांत मात्र दर हजार पुरुषामागें १,०२२ स्त्रिया आहेत.

**'पठाण' नाटकाचा चित्रपट**—सुप्रसिद्ध नट पृथ्वीराज कपूर ह्यांच्या नाटककंपनीच्या 'पठाण' नाटकाचा बोलपट तयार करण्यांत येणार आहे असें समजतें. हा बोलपट सरहद्द गांधींना समर्पण करण्यांत देईल. सध्या सरहद्द गांधी पाकिस्तान सरकारच्या कैदेंत आहेत. पृथ्वीराज कपूर ह्यांच्या इतरहि कांहीं नाटकांचे बोलपट घेण्यांत येणार आहेत.

**मागासलेल्या विद्यार्थ्यांना मदत**—कॉलेजमध्यें शिक्षण घेणाऱ्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देण्यासाठीं बिहारच्या सरकारनें ४५,००० रुपये मंजूर केले आहेत.

**कलकत्ता ट्रॅम्वेचें राष्ट्रीयीकरण**—प. बंगालचें सरकार कलकत्त्यामधील ट्राम्वेच्या राष्ट्रीयीकरणाचा कायदा करणार आहे. ह्यासंबंधीं कंपनीशीं करण्यांत आलेल्या करारांत पुढीलप्रमाणें व्यवस्था करण्यांत आली आहे. कायदा मंजूर झाल्यावर २० वर्षेपर्यंत कंपनीनेंच कारभार पहावा. त्या काळांत कंपनीचें जेवढें भांडवल गुंतलेलें असेल त्यावर ४ टक्केच नफा देण्यांत यावा. त्यानंतर सरकारनें ३७,५०,००० पौंड किंमत देऊन कंपनीचा ताबा घ्यावा. वरील रकमेशिवाय कंपनीनें कांहीं अधिक भांडवल गुंतविलें असल्यास तें आणि ४ टक्के नफ्याचा न दिलेला भागहि सरकारनें द्यावयाचा आहे. ४ टक्क्यांपेक्षा अधिक झालेला नफा सरकारला मिळेल.

**कोलंबो योजनेची मदत**—कोलंबो योजनेप्रमाणें भारताला मिळणाऱ्या मदतीपैकीं एक भाग म्हणून आस्ट्रेलिआकडून ८,५०० टन गहू मिळणार आहे. आस्ट्रेलिअन व्हीट बोर्डानें गहू वाहून नेण्यासाठीं बोटीची व्यवस्था केली असून तो मद्रास बंदरांत उतरविण्यांत येणार आहे.

**चीनसाठीं भारतीय कापड**—भारत चीनला २ कोटी वार मध्यम प्रतीचें कापड चालू वर्षी पुरविणार आहे. ह्या कापडाची किंमत सुमारें २ कोटी रुपये होईल. कापडाची खरेदी करण्यासाठीं चिनी सरकारनें कलकत्त्यामधील एका चिनी कंपनीची नेमणूक केली आहे. ह्या कराराचा तपशील अद्याप प्रसिद्ध झाला नाहीं.

**जयपुरांत येणाऱ्या प्रवाशांवर कर**—जयपूर म्यु. कौन्सिलनें शहरांत येणाऱ्या प्रत्येक यात्रेकरू प्रवाशाकडून दोन आणे कर घेण्याचें ठरविलें आहे. ह्या करामुळें नगरपालिकेला दरवर्षी तीन लाख रुपये उत्पन्न होईल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**वनस्पति-तुपावरील निर्यात कर**—गुजराथ चेंबर ऑफ कॉमर्सच्या पत्राला उत्तर देतांना, भारतीय सरकारनें वनस्पति-तुपाच्या निर्यातीवरील कर रद्द केल्याचें कळविलें आहे. ह्या तुपावर दर टनामागें ३२० रुपये निर्यात कर घेण्यांत येत होता.

**'रामदास' बोट वर काढणार**—१९४७ सालीं मुंबईजवळील समुद्रांत बुडालेली 'रामदास' बोट वर काढण्याचें मुंबई पोर्ट ट्रस्टनें ठरविलें आहे. हें काम करण्याचें कंत्राट एका इटालिअन कंपनीला देण्यांत येणार असून त्यासाठीं १२ लाख रुपयांवर खर्च येईल. 'रामदास' शिवाय इतर दोन बोटींहि वर काढण्यांत यावयाच्या आहेत.

**ब्रह्मदेशांत शब्दकोड्यांना मज्जाव**—ब्रह्मदेशच्या सरकारनें वृत्तपत्रांतील शब्दकोड्यांच्या स्पर्धा जुगार कायद्यासाली बेकायदा ठरवून, त्या थांबविण्यासाठी १५ दिवसांची मुदत दिली आहे. रंगूनमधील वृत्तपत्रांतून सहा शब्दकोडीं जाहीर होतात. बक्षिसाची रक्कम २५,००० रुपयांपर्यंत असलेल्या वृत्तपत्रांचें मुख्य उत्पन्न कोड्यापासून मिळतें. त्यांच्या संपादकांनीं सरकारनें आपला निर्णय बदलावा अशी विनंति करण्याचें ठरविलें आहे.

**जंगलांतील वस्तूंपासून नवीन पदार्थ**—जंगलांत मिळणाऱ्या वस्तूंचा उपयोग करून नवीन टिकाऊ माल तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचें काश्मीरच्या सरकारनें ठरविलें आहे. कारखाना काढण्यासाठी एका तज्ज्ञाची मदत घेण्यांत आली आहे. भांडवल सुमारें ५,००,००० रुपये लागेल आणि कारखान्यांत ४,००० लोकांना रोजगार मिळूं शकेल.

**ब्रिटनमध्यें तेलाच्या खाणी**—ब्रिटनमधील डेव्हन ह्या परगण्यांत तेलाच्या खाणी लागतील, असें एका ब्रिटिश खाणी-इंजिनिअरचें मत आहे. परगण्यांतील हा भाग सुमारें १२ मैल लांब आणि तीन मैल रुंद आहे. अधिक तपास करण्यांत येत असून विहिरी खोदण्यास लवकरच प्रारंभ होईल.

**खोट्या खादीची विक्री**—खोट्या खादीची खरी खादी म्हणून जी विक्री होते ती थांबविण्यासाठी संयुक्त प्रांत सरकार एक कायदा तयार करीत आहे. अखिल भारतीय चरखा संघाचा परवाना ज्या विक्रेत्याला मिळेल त्यालाच फक्त खादी विकतां येईल अशी व्यवस्था संकल्पित कायद्यांत करण्यांत येणार आहे. कायदा मोडणारास ६ महिने कैद आणि १,००० रुपये दंडाची शिक्षा ठेवण्यांत येणार आहे.

**अलाहाबाद विद्यापीठाला कर्ज**—अलाहाबाद विद्यापीठाची आर्थिक परिस्थिति हलाखीची झाल्यामुळें नौकरवर्गाचे पगार देणेंहि अशक्य झालें होतें. संयुक्त प्रांत सरकारनें विद्यापीठाला ६ लाख रुपयांचें कर्ज देण्याचें ठरविलें आहे. कर्जावर व्याज घेण्यांत येणार नसून त्याची फेड विद्यापीठानें १२ वार्षिक हप्त्यांनीं करावयाची आहे. कर्जफेडीचा पहिला हप्ता १ एप्रिल, १९५४ रोजीं सुरू होईल.

**महारोग्यांच्या वसाहतीसाठी रेडिओ**—हृषिकेश जवळील एका खेड्यांत महारोग्यांची वसाहत करण्यांत आली आहे. एकूण महारोग्यांची संख्या ३०० असून ते रस्त्यावर भीक मागत हिंडत असतात. वसाहतीच्या उपयोगासाठी उत्तर प्रदेशाचे मुख्य प्रधान पं. पंत ह्यांनीं एका रेडिओची देणगी दिली आहे.

**गोव्यांत जपानी कंपनी**—गोव्यांतील लोखंडाच्या मातीचा उपयोग करून लोखंड तयार करण्यासाठी जपान एक्सपोर्ट बँकेनें एका जपानी कंपनीला ५० कोटी येनचें कर्ज देण्याचें ठरविलें आहे, असें समजतें. कर्ज दीर्घ मुदतीचें आहे.

**दावणगिरीला एंजिनिअरिंग कॉलेज**—म्हैसूर राज्यांतील चौथें एंजिनिअरिंग कॉलेज दावणगिरी येथें काढण्यास म्हैसूर सरकारनें मंजुरी दिली आहे. नव्या कॉलेजमधील पहिल्या वर्षाचे वर्ग उघडण्यास ५०,००० रुपये खर्च येणार आहे. हा वर्ग १९५१ च्या ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. सुमारें ८० विद्यार्थ्यांची सोय प्रथम होऊं शकेल. म्हैसूर संस्थानांत बंगलोर व म्हैसूर येथें एंजिनिअरिंग कॉलेजें आहेत.

**महात्माजीविषयक चित्रकोश**—महात्मा गांधींचीं चित्रें असलेला दोन खंडाचा ग्रंथ तयार करण्याचा भारतीय सरकार विचार करीत आहे.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९९,३८५ |

**एकूण खेळतें भांडवल ६३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. वाळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. मा. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# बँक ऑफ पूना, लिमिटेड.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

— संचालक मंडळ —

१ श्री. मुरलीधर चतुरभुज लोया, (चेअरमन)
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., व्हा. चेअरमन.
३ डॉ. ना. भि. परुळेकर, संचालक 'सकाळ'
४ श्री. फ्रामजी पेस्तनजी पोचा, सीड्स मर्चंट
५ श्री. लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, बँकर्स व मर्चंट सोलापूर
६ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी, व्यापारी
७ श्री. गणपतराव काळूराम नाईक, बी. एस्सी., बी. ई., एलएल्. बी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याची सोय.

ठेवींवर व्याज—
चालू खातें अर्धा टक्का, सेव्हिंग्ज १॥ टक्के,
मुदत ठेव १ वर्ष २॥ टक्के, ३ वर्षें ३ टक्के.

शाखा स्थानिक-(१) भवानी पेठ, व (२) सदाशिव पेठ, पुणें.
बाहेरगांवीं—सोलापूर, सांगली.
मुख्य ऑफिसः—४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

गो. गं. साठे.
मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. ५ सप्टेंबर, १९५१

संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे




## पर-राष्ट्रांना अमेरिकेची मदत

### इंग्लंडची प्रतिकूल परिस्थिति : अमेरिकेच्या शुद्ध भावाची कसोटी

ब्रिटनचे अर्थमंत्री मि. ह्यू गेटसकेल चालू महिन्यांत इंटरनॅशनल मोनेटरी फंड व बँक ह्यांच्या वार्षिक बैठकीसाठीं अमेरिकेला जाणार आहेत. त्यावेळीं अमेरिकन अधिकाऱ्यांशीं ब्रिटनपुढील आर्थिक प्रश्नाविषयीं चर्चा करण्यांत येईल असें समजतें. ह्या होऊं घातलेल्या चर्चेत कोणते विषय येतील हें सांगणें फारसें कठीण नाहीं. ब्रिटनचा कम्युनिस्ट राष्ट्रांशीं जो व्यापार-व्यवहार चालू आहे तो बऱ्याच अमेरिकनांना आवडत नाहीं. आज ब्रिटन कम्युनिस्ट चीनशीं व्यापार करीत आहे. रशिया आणि तदंकित देश ह्यांना युद्धोपयोगी वस्तूंचा जो पुरवठा ब्रिटनकडून होत असे तो आतां कमी प्रमाणांत होत आहे. तरीपण टिन, रबर, इत्यादि माल थोड्याबहुत प्रमाणांत अजूनहि कम्युनिस्ट राष्ट्रांकडे पाठविला जातो. हा व्यापार पूर्णपणें थांबविणें ब्रिटनला शक्य नाहीं. कारण, कम्युनिस्ट राष्ट्रांकडून ब्रिटनला लाकूड व अन्न-साहित्य घ्यावें लागतें. गेल्या वर्षीं रशियाकडून ब्रिटनला स्वतःच्या अन्नाच्या आयातीपैकीं एक तृतियांश अन्न-धान्य मिळालें, एक-चतुर्थांश लाकूड-फाटादि रशियांकित देशांकडून मिळाला. हा पुरवठा अमेरिका करण्यास तयार असेल तरच रशियाशीं चाललेला व्यापार बंद करण्याचा ब्रिटन विचार करूं शकेल. पण तसें न करतां नुसतीच व्यापारबंदीची मागणी अमेरिकेनें केल्यास ब्रिटनचा स्वाभिमान दुखविला जाणार आहे. ह्या सर्व प्रश्नांची मि. ह्यू गेटसकेल ह्यांना चर्चा करावी लागणार आहे. अमेरिकेच्या परराष्ट्रविषयक धोरणाशीं ब्रिटननें कितपत जुळवून घ्यावें ह्या प्रश्नाचें उत्तर वरील आर्थिक प्रश्नांच्या सोडवणुकीवर अवलंबून आहे.

आज ब्रिटनची आर्थिक परिस्थिति अडचणीची झाली आहे असा होत आहे. शस्त्रीकरणाच्या वाढत्या खर्चामुळें ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेवरील ताणहि वाढत आहे. गेल्या वर्षीं ब्रिटननें आपली आर्थिक परिस्थिति बरीच सुधारली, आणि ही परिस्थिति इतक्या झपाट्यानें सुधारत गेली कीं अमेरिकेकडून इकॉनॉमिक कोऑपरेशन ॲडमिनिस्ट्रेशनतर्फे मिळणारी मदतहि ब्रिटननें घेतली नाहीं. आज मात्र परिस्थितीला प्रतिकूल वळण लागलेलें दिसत आहे. शस्त्रास्त्रें वाढविण्याचा कार्यक्रम आणि कच्च्या मालाला द्याव्या लागणाऱ्या चढत्या किंमती ह्यांच्या कात्रींत ब्रिटनची अर्थ-व्यवस्था अरिष्टाच्या उतरणीला लागल्याचें दिसून येत आहे. ब्रिटनच्या परदेशीय व्यापारांत प्रतिकूल तफावत पडूं लागली आहे. चालू वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत ब्रिटननें निर्यातीपेक्षा ६७०.९ कोटी पौंड किंमतीचा अधिक माल आयात केला. गेल्या वर्षीं ह्याच कालखंडांत प्रतिकूल तफावत सुमारें २५५.५ कोटी पौंडाची होती. परदेशीय व्यापाराचा हा ओघ असाच चालू राहिल्यास ब्रिटनला अमेरिकेची मदत मागितल्याशिवाय दुसरा मार्गच रहाणार नाहीं. ही मदत अमेरिका मुख्य दोन मार्गांनीं देऊं शकेल. अमेरिकेकडून घेतलेल्या कर्जाचा हप्ता ब्रिटनला चालू वर्षाच्या शेवटीं द्यावयाचा आहे. तो हप्ता देण्याचें तात्पुरतें लांबणीवर टाकण्याची सवलत अमेरिका देऊं शकेल, किंवा प्रत्यक्ष आर्थिक साह्यहि करूं शकेल. अर्थात्, ही आर्थिक मदत शस्त्रास्त्रांच्या वाढीसाठींच वापरावी लागेल.

अमेरिकेकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीसंबंधीं पौर्वात्य राष्ट्रांत एक प्रकारची संशयाची भावना दृष्टीस पडते. पौर्वात्य राष्ट्रें अनेक दृष्टींनीं अमेरिकेपासून भिन्न प्रकारचीं आहेत. त्यांना मदत करण्यांत अमेरिकेची दृष्टि पूर्ण व्यवहारी असणें साहजिक आहे असें म्हणतां येण्यासारखें आहे. परंतु भाषिक व वांशिक भेद नसतांना ब्रिटनशीं होणाऱ्या आर्थिक व्यवहारांत अमेरिकेनें व्यापारी वृत्ति स्वीकारली तर तें कितपत योग्य होईल ? आर्थिक व्यवहार आधुनिक जगांत सर्वंकष ठरतात असा अनुभव आहे. ब्रिटन व अमेरिका ह्यांच्यामधील राजकीय व आर्थिक संबंध कोणत्या धोरणानुरूप ठरतात हें स्पष्टपणें दिग्दर्शित होण्याचा काळ आतां फारसा दूर राहिलेला नाहीं. राष्ट्रा-राष्ट्रांमधील व्यापारांत अडचणींचा गैरफायदा घेणें सामान्यतः अनिष्ट समजलें जातें. अमेरिकेनें ब्रिटनच्या आर्थिक अडचणींचा फायदा घेऊन आपलें राजकीय धोरण ब्रिटनवर लादलें तर अमेरिकेच्या जागतिक प्रतिष्ठेला जोराचा धक्का लागल्याशिवाय रहाणार नाहीं. हा धोका पत्करून ब्रिटनला आपल्या लगामीं लावावयाचें किंवा आर्थिक व्यवहारांचें राष्ट्रांचें स्वातंत्र्य मान्य करावयाचें, असे दोनच पर्याय अमेरिकेपुढें आहेत. त्यांपैकीं अमेरिका कोणता स्वीकारते, तें काळच दाखवील.

### श्री. धों. कृ. साठे ह्यांचा गौरव

श्री. धोंडूमामा साठे ह्यांचा ६१ वा वाढदिवस गेल्या आठवड्यांत साजरा करण्यांत येऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगीं त्यांच्या अनेकविध कामगिरीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यांत आली. त्यांनीं स्थापलेल्या इंजिनियरिंग कॉलेजचाहि उल्लेख प्रामुख्यानें करण्यांत आला. आमच्या मतें, इंजिनिअरिंग कॉलेजच्या स्थापनेनें श्री. धोंडूमामा ह्यांनीं महाराष्ट्रावर फार मोठे उपकार केलेले आहेत. नागरी, औद्योगिक व संरक्षणाच्या स्थापत्य-विषयक गरजा भागविण्यासाठीं तज्ज्ञांची मोठी आवश्यकता असते आणि असे महाराष्ट्रीय तज्ज्ञ निर्माण करणाऱ्या संस्थेचे श्री. साठे हे जनक आहेत. त्यांचें इंजिनिअरिंग कॉलेज एक राष्ट्रीय गरज भागवीत आहे, एवढेंच नव्हे तर त्यांतून बाहेर पडणारे तरूण इंजिनिअर स्वतः मोठ्या प्रमाणावर अर्थोत्पादन करूं लागले म्हणजे त्याचा झराहि महाराष्ट्रास समृद्ध करूं लागणार आहे. अशा रीतीनें प्रस्तुत कॉलेजामुळें महाराष्ट्रांत तज्ज्ञांची निर्मिति होऊन त्यांचे द्वारा राष्ट्राचा व महाराष्ट्राचा उद्धार होणार आहे. श्री. साठे ह्यांनीं कॉलेजासाठीं केलेले श्रम सुप्रसिद्धच आहेत आणि त्यांच्या स्वार्थत्यागासहि सीमा नाहीं. नवी कंपनी काढ-

णाऱ्या मॅनेजिंग एजंटापेक्षा त्यांची भूमिका अगदी भिन्न आहे हें जाणून महाराष्ट्रीयांनीं श्री. सांठे ह्यांच्या उपक्रमास आपण होऊन हातभार लावावा व त्यांचें काम हलकें करावें, हें इष्ट आहे. आम्हीं श्री. धोंडूमामांच्या त्यागाबद्दल व सेवेबद्दल ह्या निमित्तानें आदर व्यक्त करून त्यांना दीर्घायुष्य चिंतितों.

### फक्त एकाच सहकारी संस्थेकडून कर्ज घेतां येणार

एकाहून अधिक सहकारी पतपेढ्यांचा सभासद असलेल्या इसमावर त्यानें फक्त एकाच पतपेढीकडून कर्ज घेतलें पाहिजे असा निर्बंध घालता यावा म्हणून मुंबई सरकारनें १९२७ च्या सहकारी संस्थांसंबंधींच्या नियमांत दुरुस्ती केली आहे.

आतां दुरुस्त केलेल्या ४५ व्या नियमानुसार जो इसम एकाहून अधिक पतपेढ्यांचा किंवा लँड मॉर्गेज बँक, सेंट्रल फायनॅन्सिंग एजन्सी किंवा सेल सोसायटी या व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याहि पतपेढ्यांचा १० ऑगस्ट, १९५१ रोजीं सभासद असेल अशा प्रत्येक इसमास १० ऑगस्ट १९५१ पासून किंवा तो नंतर सभासद झाला असेल तर त्या तारखेपासून ६० दिवसांच्या आंत ठराविक फॉर्मवर एक डिक्लरेशन सादर करावें लागेल. आपण फक्त एकाच पतपेढीकडून कर्ज घेऊं असें त्या डिक्लरेशनमध्यें नमूद करावें लागेल आणि सदरहू डिक्लरेशनच्या प्रती तो ज्या पतपेढ्यांचा सभासद असेल त्या पतपेढ्यांना पाठवाव्या लागतील.

एकादा इसम उपरोक्त नियमाचें पालन न करतां एकाहून अधिक पतपेढ्यांचा सभासद राहील तर रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज यांच्याकडून लेखी रिक्विझिशन आल्यास त्याचें एका किंवा सर्व पतपेढ्यांचें सभासदत्व रद्द होऊं शकेल.

### दि कॉमनवेल्थ विमा कंपनी लि.

वरील कंपनीनें १९५० साली ५८,४१,४५० रुपयांचें आयुर्विम्याचें काम पुरें केलें. १९४९ मधील कामापेक्षा हें काम २३% अधिक आहे. एकूण उत्पन्न १९,५७,८४९ रु. झालें. लाइफ ॲ. फंडांत ६,४०,९४५ रु. ची भर पडली. तो फंड आतां १,०१,३२,३४२ रु. झाला आहे. अहवालाचे वर्षी कंपनीनें ५,३६,७१७ रु. चे क्लेम्स दिले.

कंपनीच्या आगीच्या विमा खात्याचें उत्पन्न २,०८,७१८ रु. झालें. त्यापैकी १,१९,०२२ रु. हप्त्यांचें होतें. एकूण खर्च २,०६,१५७ रु. होऊन २,५६१ रु. नफा उरला. हप्त्यांच्या उत्पन्नाच्या ४०% रक्कम रिझर्व्ह म्हणून काढली असून ५,०५२ रु. प्राथमिक खर्च पूर्णपणें लिहून टाकण्यांत आला आहे.

कंपनीची वार्षिक सभा ता. १५ रोजीं आहे.

### अजब कारकसर

फ्रान्समधील एका ७६ वर्षांच्या शेतकऱ्यानें नुकतीच आत्महत्त्या केली. आत्महत्त्येच्या आदल्याच दिवशीं त्याचे सर्व नातेवाईक त्याच्याच निमंत्रणावरून त्याचे घरीं एका कौटुंबिक समारंभासाठी जमले होते, त्यामुळें त्याच्या आत्महत्त्येबद्दल सर्वांना आश्चर्य वाटलें. उत्तरीय तपासणीच्या वेळीं, त्याच्या शवाजवळ सांपडलेली चिठ्ठी वाचण्यांत आली, तेव्हां सर्व उलगडा झाला. "मला लवकरच नैसर्गिक मृत्यु येणार, हें ठरलेलेंच होतें. तेव्हां, घरीं मुलें-बाळें असतांनाच आत्महत्त्या करण्याचें मी ठरविलें. नाहींतर, माझ्या अंत्यविधीसाठी त्यांना मुद्दाम पैसे खर्च करून प्रवास करावा लागला असता" असा त्या चिठ्ठींत मजकूर होता.

## जपानच्या कापडधंद्याची प्रगति

जपाननें आपल्या कापडाच्या धंद्याची विशेषतः १९५० च्या ऑगस्ट महिन्यापासून विशेष वाढ केली आहे. जपानशीं अमेरिका अधिकृत रीत्या तह लौकरच करणार आहे, व त्यामुळेंहि जपानचें महत्त्व वाढून त्याच्या उद्योगधंद्यांना चालना मिळणार आहे. जपानच्या वाढत्या कापड धंद्यांतील स्पर्धेचा परिणाम लँकेशायरच्या गिरणीवाल्यांनाहि जाणवूं लागला आहे, व आफ्रिका, मध्यपूर्व आणि आशियांतील कांहीं देश यांच्या बाबतींत जपानी कापडाची चढाओढ जाणवूं लागेल अशी भीति त्यांना वाटत आहे. जपानी कापड-गिरण्यांतल्या चात्यांमध्यें १९४९ पासून एका वर्षांत १७ टक्के वाढ झाली असून, मागांच्या संख्येंतहि सुमारें ५६ टक्के वाढ झाली आहे. कापसाचाहि पुरवठा भरपूर झाल्यामुळें एकंदर कापडाची निर्मिति सहजच वाढली. १९५० सालीं १२ लक्ष गांठी कापूस जपानी गिरण्यांत खपला. याच वर्षीं जपाननें ११० कोटींहून जास्त वार कापड निर्गत केलें. पाकिस्तान, इंडोनेशिया व ब्रिटन या तीन देशांतच जपानचें सुमारें निम्में कापड खपलें. थायलंड, दक्षिण आफ्रिका, ब्रह्मदेश, फोर्मोसा, हाँगकाँग, इ. ठिकाणीं बाकीचें कापड खपलें. कापड निर्गत करण्यासाठीं जपानला कापडाचा अंतर्गत खप शक्य तितका कमी करावा लागला आहे. १९३४-३५ या वर्षीं जितकें अंतर्गत कापड सरासरी दर माणशीं जपानमध्यें खपे, त्याच्या एक-तृतियांशच हल्ली अंतर्गत खपासाठी वांटणीला येतें.

**नवें एंजिनिअरिंग कॉलेज**—कोईमतूर येथें एका नवीन एंजिनिअरिंग कॉलेजचें उद्घाटन मद्रास राज्याचे मुख्य मंत्री श्री. राजा ह्यांच्या हस्तें झालें. हें कॉलेज एका धर्मादाय संस्थेच्या सक्रिय पुरस्कारानें निघालें आहे. मद्रास राज्यांत आतां एकूण सहा एंजिनिअरिंग कॉलेजें झालीं आहेत.

**सिंद्री येथील खताचा कारखाना**—सिंद्री येथील खताच्या कारखान्यांत अमोनिअम सल्फेटचें उत्पादन कांहीं आठवड्यानंतर सुरू होईल असें समजतें. हें खत तयार होण्यापूर्वी करावयाची शेवटची रासायनिक प्रक्रिया पुरी करून ॲनहैड्रस अमोनिआ नुकताच तयार करण्यांत आला.

**बर्लिन विद्यापीठांत हिंदी शिकण्याची सोय**—दिल्ली कॉलेज ऑफ कॉमर्समधील हिंदी व संस्कृतचे प्राध्यापक श्री. राम घनशास्त्री ह्यांची बर्लिन विद्यापीठांत हिंदीचे प्राध्यापक म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे.


दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराडचे

## — भागदारांस नोटीस —

बँकेच्या भागदारांची चौतिसावी वार्षिक साधारण सभा रविवार दिनांक १६-९-१९५१ रोजीं सकाळीं ७-३० वाजतां बँकेच्या नवीन इमारतींत भरणार आहे. त्यावेळीं बँकेचा सन १९५०-५१ चा अहवाल व ताळेबंद मंजूर करणें, नियमाप्रमाणें डायरेक्टर्सची निवडणूक, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक, पोटनियम दुरुस्ती, वगैरे कामें केलीं जातील. डायरेक्टर्सचे निवडणुकीबाबत मतें देण्याची वेळ सकाळीं ८ ते दुपारीं १२-३० अशी आहे. तरी सर्व सभासदांनीं येण्याचें करावें, अशी विनंती आहे.

कऱ्हाड
दि. १ सप्टेंबर १९५१

शं. पु. कुळकर्णी
मॅनेजिंग डायरेक्टर

## " मुस्लिम देशांना सलग जोडणारी रेल्वे बांधा "

### आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक दळणवळण वाढविण्यासाठी प्रयत्न

पाकिस्तान, अफगाणिस्तान, इराण, इराक, सीरिया, जॉर्डन, साउदि अरेबिया, टर्की, लेबेनॉन, पॅलेस्टाइन व इजिप्त ह्या मुस्लिम देशांचा एक सलग पट्टा झालेला आहे. त्यांत जगांतील जमिनीचा एक दशांश भाग समाविष्ट असून त्यांतील लोकसंख्याहि जागतिक लोकसंख्येच्या एकदशांशाइतकी आहे. परंतु, ह्या देशांतून एक-मेकांकडे जाण्यायेण्याच्या दळणवळणाच्या सोयी नाहींत. समान धर्म आणि जीवनाकडे पहाण्याची समान दृष्टि असूनाहि ह्या देशांचा एकमेकांशीं हवा तसा दाट परिचय नाहीं. ते एकमेकांशीं मोठ्या प्रमाणावर व्यापार करीत नाहींत; शैक्षणिक बाबतींतहि त्यांचें सहकार्य नाहीं. पूर्वेकडे पाकिस्तान व पश्चिमेकडे इजिप्त ह्यांचेमध्यें रेल्वेचें जाळेंच्या जाळें करतां येणें शक्य आहे. केटा ( बलुचिस्तान ) तें झहिदन ( इराण ) हा १०४ मैलांचा टापू आज पाकिस्तानच्या नॉर्थ वेस्टर्न रेल्वेनें जोडलेला आहेच. झहिदन व येझ्द हें ५०० मैलांचें अंतर रेल्वेनें जोडलें म्हणजे त्या फाट्यानें पुढें कुमपर्यंत तेहरान–बंदर शहपुर रेल्वे लाइननें जातां येईल. तेथून अंदिमिश्कपर्यंत सध्या रेल्वेलाईन आहेच. अंदिमिश्क ते बगदाद हा ३५० मैलांचा फाटा नवा घालावा लागेल. बगदाद ते दमास्कस ह्यांमधील प्रवासाचें अंतर कमी करण्यासाठीं ५०० मैलांची नवी लाइन टाकावी लागेल. मदिना व दमास्कस ह्यांस जोडणारी लाईन दुरुस्त करावी लागेल.

अशा रीतीनें मुस्लिम देशांतील दळणवळणाची सोय झाली, म्हणजे इराणी कोळसा पाकिस्तानची गरज भागवूं शकेल. इराणी गालिचे, सुका मेवा, कातडीं, इत्यादि जिनसाहि पाकिस्तानाकडे जाऊं लागतील. पाकिस्तान इराणकडे चहा व साखर धाडूं शकेल. पाकिस्तानी कटलरी, क्रीडासाहित्य, तागाचे जिन्नस हे इराण-मध्यें खपूं शकतील. इराकजवळ पेट्रोल आहे, पण तें निर्यात कर-ण्याला स्वतःच्या आगबोटी नाहींत. रेल्वे मार्गानें पाकिस्तानास इराकचें पेट्रोल नेतां येईल. अरबी घोडेहि इराक पाकिस्तानला पुरवूं लागेल. पाकिस्तान इराकला साखर, कापड व सिमेंट देऊं लागेल. धार्मिक व सांस्कृतिक दृष्टीनेंहि पाकिस्तान-इराण-इराक-सिरिया-जॉर्डन-मदिना टर्की- इजिप्त ह्यांचें दळणवळण फायदे-शीर होईल. मदिना आणि मक्का ह्यांच्या वारीचा खर्च उतरेल व वारकऱ्यांची संख्या वाढेल. अशा रीतीनें रेल्वेसाठी होणारा प्रचंड खर्च सहज भरून येईल. " ख्वाजा शहाबुद्दिन ह्यांचें कराची येथील वर्ल्ड मुस्लिम कॉन्फरन्समधील भाषण; फेब्रुवारी १९५१.

---

### त्रावणकोर–कोचीनमधील बँकांचें वैशिष्ट्य

त्रावणकोर–कोचीन बँकर्स असोसिएशनची वार्षिक परिषद् नुकतीच भरली होती. ह्या परिषदेचें अध्यक्षस्थान भारतीय सरका-रचे माजी आर्थिक सल्लागार डॉ. पी. जे. थॉमस ह्यांनीं स्वीकारलें होतें. आपल्या अध्यक्षीय भाषणांत डॉ. थॉमस ह्यांनीं बँकिंगचा व्यवसाय व ग्रामीण भागांतील पैसा ह्यासंबंधीं कांहीं महत्त्वाचे विचार प्रदर्शित केले. डॉ. थॉमस म्हणाले कीं त्रावणकोर-कोचीन-मधील बँकांनीं आपला विस्तार खेडेगांवांपर्यंत पोंचविला आहे ही खरोखर अभिमानाची गोष्ट आहे. सध्यां व्यापारी दृष्टीनें महत्त्वाच्या असणाऱ्या पिकांना चांगल्या किंमती येत आहेत. ही एक अनपे-क्षित देणगीच समजून विक्रीच्या पैशाचें जतन केलें पाहिजे; म्हणजे वाईट परिस्थितींत त्या पैशाचा उपयोग होऊं शकेल. भारतांतील बहुतेक भागांत बँकिंगचा व्यवसाय प्रमुख शहरांच्या बाहेर फारसा पसरलेला नाहीं. त्रावणकोर–कोचीन राज्यांत मात्र ह्या व्यवसायाची लक्षांत भरण्यासारखी प्रगति झालेली दिसून येते. खेड्यापाड्यांतून सुद्धां बँकेचा व्यवसाय पसरविण्याचें हें यश कशामुळें आलें ? ग्रामीण भागांतील बचत झालेला पैसा गोळा करणें आणि तेथील लोकांना पतीवर पैसा देणें ह्या गोष्टी त्रावणकोर–कोचीन राज्यांतील बँकांनीं साध्य केल्या आहेत. कारण, आपल्या गिऱ्हाइकांची विशिष्ट परिस्थिति आणि गरजा ह्यांना साजेशा मार्गाचाच ह्या बँकांनीं अवलंब केला. तथापि, बँकिंगच्या व्यवसायाची अधिक प्रगति होण्यास दीर्घकाल चाल-णारी कर्जेदलाली ही फार मोठी अडचण राज्यांत भासत आहे. ही परिस्थिति कायम आहे तोंपर्यंत शेतीला मदत करण्याची बँकांची इच्छा फलद्रूप होणार नाहीं. दुसरी अडचण अशी कीं जमिनी गहाण टाकून पैसे उभारण्यास खर्च फार येतो. शिवाय इतरही अडचणी आहेत. शहरांतील मालमत्तेच्या मालकीविषयक कागद्-पत्रांचे तारणावर कर्ज देण्यासाठी भारतामधील मोठमोठ्या शहरां-तून " इक्विटेबल मॉर्टगेज ' चा उपयोग करण्यांत येतो. ह्या पद्धतीचा उपयोग अधिक मोठ्या क्षेत्रांत करतां येईल कीं नाहीं हें पहाणें सरकारचें काम आहे. होतकरू बँकर्स आणि त्यांचे दुय्यम ह्यांना शिक्षण देण्याची आवश्यकताहि डॉ. थॉमस ह्यांनीं प्रतिपादन केली.

---

### राजस्थानमधील खनिज संपत्ति

राजस्थान राज्याचे डायरेक्टर ऑफ माइन्स श्री. एम्. एल. सेठी ह्यांनीं, राज्यांतील उद्योगपती आणि सरकार ह्यांनीं मिळून खनिज संपत्तीचा उपयोग शास्त्रीय दृष्ट्या करून घेतला पाहिजे, असे विचार नुकतेच व्यक्त केले. राजस्थानमधील खनिज संपत्ती-संबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, ह्या राज्यांतील कांहीं खनिजें अशीं आहेत कीं तीं फक्त राजस्थानांतच सांपडतात. अर्थात् हीं खनिजें फार महत्त्वाचीं आहेत. उदयपूर भागांत शिसें, कथील आणि चांदी हीं खनिजें सांपडतात. ह्यांच्या खाणी झावर येथें आहेत. ही खनिज संपत्ति राष्ट्रीय दृष्ट्या किती महत्त्वाची आहे हें सांगणें नकोच. राजस्थानांतील अभ्रकाचें उत्पादन भारतांत दुसऱ्या क्रमांकाचें आहे. ह्याशिवाय कॅलसाइट, स्टेटाइट, इत्यादि खनिजेंही राजस्थानांत सांपडतात. झावर येथील खाणीला पुरेसें भांडवल लाभलेलें नाहीं. त्यामुळें खनिजांचा अधिक शोध करतां येणें कठीण झालेलें आहे. हिरे सांपडण्यासाठी खडकांना भोकें पाडावीं लागतात. पण तशी यंत्रसामुग्री राजस्थानांत अद्याप आलेली नाहीं. झावर येथील खाणींत रोज फक्त २०० टन खनिजांची माती शुद्ध करण्याची सोय आहे. पुष्कळशी माती लांब बिहारमध्यें पाठवून तीमधील खनिजें गाळण्याची व्यवस्था करावी लागते. खाणीसाठीं पाण्याची व वहातुकीची व्यवस्था व विजेची सोय ह्यांची तात-डीनें आवश्यकता आहे. राजस्थानांतील जिप्समपासून सल्फ्यूरिक ॲसिड तयार करतां येणें शक्य आहे. ह्या बाबतींत राष्ट्रीय नियोजन मंडळाकडे विचारणा करण्यांत येणार आहे. भारतांत फक्त राज-स्थानांतच टंगस्टेन हा धातू सांपडतो. स्वस्त दरांत विजेचा पुरवठा होऊं शकला तर ह्या धातूचें उत्पादन करणाऱ्या भट्ट्या उभारतां येण्यासारख्या आहेत. मँगेनीज, बेरी आणि रेडिअम सांपडणारी मातीही राजस्थानांत आहे. शेवटचें खनिज सध्यां थोड्याबहुत प्रमाणांत निर्यात करण्यांत येत आहे. राजस्थानमध्यें सांपडणाऱ्या कांचेच्या वाळूचे दोन–तीन प्रकार आहेत. त्यापैकीं एक तर फारच चांगल्या प्रतीची आहे. परंतु ह्या वाळूचा उपयोग करून नवीन धंदा काढण्याऐवजीं ती निर्यात करून नफा मिळ-विण्याचीच वृत्ति दिसून येते.

## पुणें महानगरपालिका

### सन १९५०–५१ चा वार्षिक अहवाल

पुणें महानगरपालिकेचे कार्यकारी अधिकारी श्री. एस. जी. बर्वे, आय. सी. एस. यांनीं सन १९५०–५१ चा वार्षिक अहवाल प्रसिद्ध केला असून त्यामध्यें एकंदर कारभारासंबंधीं त्यांनीं तपशिलवार माहिती व विवेचन दिलें असून प्रत्येक खात्याच्या प्रमुख अधिकाऱ्यांचा अहवालहि स्वतंत्रपणें त्यांत समाविष्ट केला आहे.

#### लोकसंख्या व कार्यक्षेत्र

महानगरपालिकेचें कार्यक्षेत्र विस्तृत झालें असून त्यामध्यें आतां लगतचीं १७ खेडीं सामील करण्यांत आलीं असून आतां एकंदर क्षेत्र सुमारें ५० चौरस मैल झालें असून लोकसंख्या अंदाजीं ४,८६,००० आहे. पुणें व खडकी कन्टोन्मेन्ट यांची लोकसंख्या अनुक्रमें ५९,००० व ४८,५०० आहे. या विभागाचा यांत समावेश केल्यास महापुण्याची एकंदर लोकसंख्या ५,९३,००० होईल असें दिसतें. नगरपालिकेचा कारभार मा. म्यु. कमिशनरसाहेब हे सरकारनें नेमलेल्या १२ सल्लागार सभासदांचे समितीच्या सल्लयानें चालवितात.

#### आर्थिक प्रगति

नगरपालिकेची आर्थिक स्थिती भरभक्कम पायावर उभी आहे असें दिसतें. अहवालाचे सालांत एकूण उत्पन्न रु. १,०७,५६,१६४ होतें व खर्च रु. ९१,७०,५८० होता. यामध्यें म्युनिसिपल बस-सर्व्हिसचा समावेश केला नाहीं. त्याचें अंदाजपत्रक सुमारें २५ ला खांचें आहे. सन १९५१-५२ सालाचे अंदाजपत्रकांत कोठल्याहि प्रकाराची करवाढ नाहीं हें त्याचें वैशिष्ट्य आहे.

#### अहवालाचे सालांतील कांहीं ठळक गोष्टी

लकडीपुलाचें नवीन बांधकामास १२ नवंबर, १९५०. रोजीं सुरवात झाली. लकडीपुलाची रुंदी ७६ फूट राहील. व फूटपाथा-साठीं लागणारी जागा सोडून रस्त्यासाठीं ५२ फूट जागा राहील. यासाठीं अंदाजी खर्च रु. ६,२३,७२९ येईल. सध्याचा पूल वहातुकीस फार लहान पडत असल्यानें त्याची रुंदी वाढविणें जरूर असल्याचें ठरवून त्याप्रमाणें कामास सुरवात झाली. शहरांतील कांहीं भागास पाणीपुरवठा ठराविक प्रेशरनें होत नसल्यामुळें नवीन नळ टाकण्याचें ठरवून त्याप्रमाणें सन १९५०–५१ चे सालांत त्यासाठीं रु. २,७५,००० ची तरतूद करण्यांत आली होती. पुणें नगरपालिकेनें लष्करांतील सरकारी पाणीपुरवठ्याचें केंद्र मागितलें असून त्याबाबत अद्याप निर्णय लागला नाहीं. नगरपालिकेनें आरोग्याचे दृष्टीनें व सौंदर्याचे दृष्टीनें नदीं सुधारण्याचें काम पुढें चालू ठेवलें असून त्यासाठीं खर्चाचा अंदाज सुमारें रु. १,२५,००० धरला आहे. नदीवर एकदोन ठिकाणीं कपडे धुण्यासाठीं धोबीघाटाची व्यवस्था आहे. नगर-पालिकेच्या परवानगी खात्यानें घरासाठीं एकूण १८७४ परवानग्या दिल्या. त्यापैकीं ११७२ नवीन कामासाठीं होत्या. सन १९५०।५१ सालांत रस्ते, नगररचनेमधील रस्ते, फूटपाथ वगैरे कामासाठीं एकूण रु. १५,२६,००० ची अंदाजपत्रकांत तरतूद केली होती. त्याचप्रमाणें जंगली महाराज रस्ता रुंद करून गाडी-घोड्यासाठीं एकूण ५०' रस्ता ठेवला आहे. या रस्त्याचें सर्व काम संपूर्ण झालेवर त्यास रु. ३,२५,००० खर्च येईल असा अंदाज आहे. नगरपालिकेनें इमारती व हरिजन व म्यु. नोकर यांचे वसाहतीची योजना तयार केली असून त्यापैकीं कांहीं पूर्ण झाल्या असून कांहीं बाबतींत अंदाजपत्रकें व नकाशे तयार करण्यांत येत आहेत.

पुणें शहराचें आरोग्य उत्तम असल्याचा निर्वाळा अहवालांत दिला असून साथीचे रोग वगैरेचा प्रादुर्भाव झाला नाहीं. जंतुनाशक पावडरनें घरें धुण्याची पद्धति अवलंबिली आहे. म्यु. दवाखान्यांत एकूण ९,८४,००० रोग्यांना औषधोपचार करण्यांत आले. नगरपालिकेचें एक स्वतांचें रुग्णालय काढण्याबाबत विचार चालू आहे. क्षयासारख्या संसर्गजन्य रोगांसाठीं उपाययोजना करण्यासाठीं सोय करण्यांत आली आहे. नगरपालिकेनें शहरां-तील अस्वच्छ व दाट वस्तींची पाहणी केली आहे. शहरांत असे एकंदर ११३ भाग असून त्यांत राहणारी कुटुंब संख्या ६३०४ आहे. असे विभाग सुधारण्याची योजना हातीं घेतली असून यथानुक्रमें त्याबाबत प्रगती करण्यांत येणार आहे.

पुणें नगरपालिकेचा कारभार सुमारें दोन वर्षांपूर्वी सरकार-नियुक्त अशा अधिकाऱ्याकडे गेला व त्या अवधींत नगरपालिकेस लोकप्रिय व कार्यक्षम असे श्री. बर्वे, आय. सी. एस. हे लाभले व त्यांनीं अविरत कष्टानें कारभारांत सुव्यवस्था निर्माण करून नागरिकांच्या सुखसोई, शहराचें सौंदर्य, आरोग्य व स्वास्थ्य यासाठीं दूरदृष्टीनें योजना आखल्या व त्यापैकीं कांहींची अंमलबजावणी सुरू केली. उत्तम व पद्धतशीर कामाचा भक्कम पाया त्यांनीं घातला. याबद्दल त्यांचें कोणीही अभिनंदनच करील. कार्यक्षम व दूरदृष्टि असलेल्या अधिकाऱ्यास सत्ता व पैसा दिला असतां स्थानिक स्वराज्य संस्थासारख्या लोकहित संस्थेंत किती प्रचंड काम करतां येतें, याचें हें उदाहरण आहे.

श्री. बर्वे यांचें याबाबत आणि हिशेबी वर्ष संपल्यानंतर अवघ्या तीनचार महिन्यांत तपशीलवार व माहितीपूर्ण अहवाल प्रसिद्ध केल्याबद्दल अभिनंदन करणें जरूर आहे. य. द. खो.

---

#### अभिनंदन

श्री. एल. एन. रेणु, प्रांतिक औद्योगिक सहकारी संघाचे ऑ. सेक्रेटरी व 'सहयोग'चे संपादक यांना भारत सरकारचे डेव्हलप-मेंट ऑफिसर (कॉटेज इंडस्ट्रीज) नेमलें आहे. १ सप्टेंबर १९५१ रोजीं ते या कामावर रुजू झाले.

---



#### पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें शहर

## नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडची ३४ सावी वार्षिक साधारण सभा रविवार दिनांक १६ सप्टेंबर १९५१ रोजीं सायं-काळीं ५–३० वाजतां पुणें नूतन मराठी विद्यालयाचे असेंब्ली हॉलमध्यें भरेल. या सभेंत सन १९५०–५१ सालचा बँकेचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफावाटणी मंजूर करणें, हिशेबतपा-सनिसांच्या तपासणी यादीचा विचार करणें, पोटनियम नंबर ७७ अन्वयें मे. बोर्डानें केलेल्या नियमांतील दुरुस्त्यांची माहिती घेणें, पुढील सालासाठीं डायरेक्टर्स, चेअरमन व व्हाईस चेअरमन निव-डणें, स्थानिक हिशेब तपासनिसांचें वेतन ठरविणें, व याशिवाय सालाबादप्रमाणें इतर मामुली विषयांचा विचार करणें वगैरे कामें होतील. डायरेक्टरांची निवडणूक त्याच दिवशीं व त्याच इमार-तींत सकाळीं ८–३० ते दुपारीं १२ वाजेपर्यंत होईल. तरी सदर निवडणुकीस व सभेस सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंती आहे.

पुणें. बोर्डाचे हुकुमावरून,

दिनांक २९–८–१९५१. मो. वि. रवडे

मॅनेजिंग डायरेक्टर.

## चलनविस्तार व महागाई या बाबतींत ब्रिटनची उपाय-योजना

गेले कांहीं महिने वाढत्या महागाईनें ब्रिटनला त्रस्त करून सोडलें आहे व परराष्ट्रीय व्यापाराची परिस्थितीहि गेले कांहीं महिने समाधानकारक नाहीं. गेल्या वर्षी परराष्ट्रीय व्यापारांत ब्रिटनला २० कोटी पौंडांची अनुकूल तफावत उरली होती, परंतु दोन महिन्यापूर्वी आयात मालाच्या किंमतींत गेल्या वर्षाच्या मानानें ४३ टक्के वाढ झाल्यामुळें व्यापारी देण्याबद्दलच्या अडचणी पुन्हा निर्माण झाल्या आहेत. ब्रिटनच्या एकंदर वार्षिक साधनसामुग्रीपैकीं १६ टक्के साहित्य परदेशांतून आयात होत असल्यामुळें परदेशी मालाच्या किंमतींतील वाढीचा त्वरित परिणाम बाजारभावावर होतो. या महागाईवर एक उपाय-योजना म्हणून ब्रिटनचे अर्थमंत्री मि. गेटस्केल यांनीं पुढील तीन वर्षेपर्यंत कंपन्यांनीं वाटावयाच्या डिव्हिडंडवर मर्यादा घातली असल्याचें जाहीर केलें. गेलीं दोन वर्षे ज्या प्रमाणांत डिव्हिडंड वांटण्यांत आले त्यापेक्षां जास्त डिव्हिडंड वांटतां कामा नये असें अर्थमंत्र्यांनीं ठरविलें आहे. १९४८ ते १९५० च्या दरम्यान मजुरीचे दर व किंमती सामान्यपणें स्थिर राहिल्यामुळें ब्रिटनच्या उत्पादनाची व परराष्ट्रीय व्यापाराची परिस्थिति चांगली सुधारूं शकली. परंतु १९५० च्या मध्यानंतर कोरियन प्रकरणामुळें कच्च्या मालाच्या किंमती एकदम वाढूं लागल्यामुळें महागाई होण्याचा प्रारंभ झाला; व उत्पादन आणि व्यापार या बाबतींत परिस्थिति बिघडूं लागली. १९४७ चा राहाणीचा निर्देशांक १०० मानला तर सप्टेंबर १९५० मध्यें तो ११४ झाला व चालू वर्षाच्या जूनमध्यें तो १२५ झाला. गेल्या नऊ महिन्यांत मजुरीचे दर शेंकडा ८ या प्रमाणांत वाढले आहेत, परंतु त्या पूर्वींच्या तीन वर्षांत मजुरीच्या दरांत फक्त शेंकडा ४ च्या प्रमाणांत वाढ झाली होती. अलिकडे आठवड्याला सुमारें २७ ते २८ लक्ष पौंड मजुरांच्या वेतनांत वाढ करावी लागली आहे व ही वाढ महागाई करावयास कारण होत आहे. महागाई कमी करण्याचा मूलभूत उपाय म्हणजे परदेशांतून आयात होणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमती कमी करवून घेणें हा होय. आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चा किंवा वाटाघाटी करून कच्च्या मालाच्या किंमती मर्यादित राखण्यासाठीं सरकार प्रयत्न करणार आहे, परंतु अजून त्याला थोडा वेळ आहे. गेले तीन महिने शेंकडा १२ प्रमाणांत कच्च्या मालाच्या किंमती उतरल्या आहेत ही आशाजनक गोष्ट आहे, परंतु लोह-विरहित धातूंच्या किंमती अजून वाढतच आहेत. किंमतीवर निरनिराळ्या प्रकारचीं नियंत्रणें ठेवण्याचा सरकारनें निश्चय केला आहे, व यामुळें किरकोळ किंमती मर्यादित राहूं शकतील. बँकांनीं कर्जे देण्याच्या बाबतींतहि कडक निबंध लादले जातील. चालू वर्षाच्या एप्रिल ते जून या महिन्यांत कंपन्यांच्या डिव्हिडंड वांटणींत ८ ते १४ टक्के वाढ झालेली दिसते. डिव्हिडंड-वाढीचा मानसिक परिणाम मजूर वर्गांवर अनिष्ट होतो; व ते पगारवाढीची मागणी तीव्रतेनें करूं लागतात. महागाई कमी करण्यासाठीं ब्रिटनचा भर कंपन्यांच्या डिव्हिडंडवर मर्यादा घालणें, अंतर्गत किंमतींवर नियंत्रणें, मजुरीचे दर स्थिर ठेवणें व कच्च्या मालाच्या आयातिक किंमती कमी करून घेणें यांवर आहे.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सारस्वत कॉलनी, सोमवार पेठ, पुणें.
बचतीच्या विविध योजना
हेड ऑफिस-गिरगांव, मुंबई.

## बोरघाटांतील बोगद्यांचें काम

### लवादाच्या निर्णयावर अपील

### ( मुंबई हायकोर्टाचा निवाडा )

बोरघाटांतील बोगद्यांच्या कंत्राटाचें काम जी. आय. पी. कडून हिंद कन्स्ट्रक्शन लि. ला मिळालें होतें. कुमार जानी आणि कं. चे श्री. सत्येंद्रकुमार जानी ह्यांना हिंद कंपनीकडून सबकॉन्ट्रॅक्ट मिळालें होतें. श्री. जानी ह्यांच्या म्हणण्याप्रमाणें हिंद कंपनीनें त्यांचें १,२५,००० रुपये ८ मे, १९४८ रोजीं देणें होतें, परंतु त्यांस फक्त ६६,७०० रु. च देण्यांत आले. त्यांनीं काम चालू ठेवलें आणि २ सप्टेंबर, १९४८ रोजीं त्यांचें बिल २,०९,३३० रुपयांचें झालें. १३ नोव्हेंबर, १९४८ रोजीं हिंद कंपनीनें कंत्राटाचा करार बेकायदा रद्द केला असें श्री. जानी ह्यांचें म्हणणें होतें. हिंद कंपनीचे जनरल मॅनेजर डॉ. पंड्या ह्यांच्या एकट्याच्या लवादाकडे उभय पक्षांनीं तंटा सोंपविला. श्री. जानी ह्यांचें म्हणणें असें, कीं लवाद नेमण्यापूर्वीं हिंद कंपनीनें पहिले ६६,७०० रु. सोडून आणखी १ लक्ष रु. त्यांना देऊं केले होते. लवाद, डॉ. पंड्या ह्यांनीं निवाड्याचें काम चालू असतांना श्री. जानी ह्यांना कंपनीकडून ४०,००० रु. 'इंटेरिम' म्हणून देवविले, आणि अखेरच्या निवाड्यांत आणखी १०,००० रु. देवविले. निवाड्यावर असंतुष्ट होऊन श्री. जानी ह्यांनीं हायकोर्टाकडे अर्ज करून निवाडा रद्द व्हावा अशी मागणी केली, परंतु न्या. शहांनीं तो अर्ज फेटाळला. श्री. जानी ह्यांनीं त्यावर केलेलें अपीलहि हायकोर्टानें फेटाळलें. डॉ. पंड्या हे हिंद कंपनीचे एक डायरेक्टर होते आणि म्हणून लवाद होण्यास अपात्र होते ही गोष्ट त्यांनीं प्रकट केली नाहीं, म्हणून त्यांचा निवाडा रद्द व्हावा अशी श्रीः जानी ह्यांची मागणी होती. डॉ. पंड्या हे एक्स-ऑफिशिओ डायरेक्टर होते; त्यांचे हिंद कंपनींत शेअर्स नव्हते; ते जनरल मॅनेजर असतांहि त्यांना लवाद म्हणन श्री. जानी ह्यांनीं मान्यता दिली होती; तेव्हां त्यांचा निवाडा दोषास्पद होत नाहीं; असा हायकोर्टाचा अभिप्राय पडला.

### वामन गणेश हरचेकर पेढीचा रौप्य महोत्सव

वामन गणेश हरचेकर व्यापारविषयक पेढीला शके १८७३ नारळी पौर्णिमेला ( तारीख १६ ऑगस्ट १९५१ रोजीं ) पंचवीस वर्षे पूर्ण झालीं. त्या निमित्त पेढीचा "रौप्य महोत्सव समारंभ" रविवार, ता. २ सप्टेंबर, १९५१ रोजीं, श्रीयुत गं. वि. उर्फ नानासाहेब पुराणिक यांचे अध्यक्षतेखालीं करण्यांत आला.

### अहवालांची साभार पोंच

दि कल्याण पीपल्स को. बँक लि. वार्षिक सभा: १२-९-१९५१. चेअरमनः दौलतराव जयरामराव झुंजारराव. मॅनेजर: बाळकृष्ण बाबुराव रुद्रभटे. धुळें अर्बन को. बँक लि. वार्षिक सभा: १६-९-१९५१ चेअरमनः शाह गोविंदजी लिमजी. मॅनेजिंग डायरेक्टर: जगन्नाथ वधु बडगुजर.

## सोन्याच्या खाणींच्या धंद्याची परिस्थिति

कोळार गोल्ड माइनिंग कंपनीचे अध्यक्ष श्री. श्रीनिवासन यांनीं नुकत्याच केलेल्या एका भाषणावरून असें दिसतें कीं, हिंदच्या संपत्तीच्या वार्षिक उत्पादनांत सोन्याच्या खाणींमुळें फक्त ६० कोटी रुपयांची भर पडते किंवा वार्षिक ८७१० कोटी रु. राष्ट्रीय उत्पन्नांत सोन्याचा खाणींचा हिस्सा फक्त तीन चतुर्थांश टक्का आहे. श्री. श्रीनिवासन यांच्या मतें सध्यां जगभर सर्वत्र खनिज पदार्थांचा तुटवडा भासत असल्यामुळें सोन्याच्या खाणींचें उत्पन्न वाढविण्यास फार अनुकूल काळ आहे. मजुरीचे वाढते दर व सरकारी करांचें वाढतें दडपण यांमुळें सोनें काढण्याचा धंदा व्हावा तितका फायदेशीर होत नाहीं. याशिवाय खाणींतील खनिज संपत्ति दरवर्षी कमी कमी होत जाते, व त्यामुळें इतर धंद्यांप्रमाणें उत्पादन कायमचें वाढवितां येत नाहीं. या धंद्यांत तोटा सोसूनहि कांहीं वेळां भांडवल गुंतविण्याचें धाडस करावें लागतें. नेहमींच्या करांव्यतिरिक्त सरकार सोन्याच्या खाणी कंपन्यापासून देणगीच्या रूपानें पैसा गोळा करतें. श्री. श्रीनिवासन् यांच्या मतें आज धंद्याबद्दल बरेचसें निरुत्साही वातावरण दिसून येतें. तेव्हां त्यांची सूचना अशी कीं, सरकारनें सोन्याच्या खाणीवरील व उत्पादनावरील कर आकारण्याच्या पद्धतींत आमूलाग्र सुधारणा करणें आवश्यक आहे. सोन्याचीं अंडीं घालणाऱ्या हंस पक्षासारखी या धंद्याची स्थिति आहे. परंतु या धंद्याची जोपासनाहि तितकीच काळजीपूर्वक केली पाहिजे.

---

### महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें.

सदर विद्यालयाच्या आठव्या शिक्षणक्रमाच्या डिप्लोमा परीक्षेचा निकाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. परीक्षेस बसलेल्या २७ विद्यार्थ्यांपैकीं एकूण १९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांची वर्गवारी पहिल्या वर्गांत १, दुसऱ्या वर्गांत १२ व तिसऱ्या वर्गांत ६, याप्रमाणें आहे. विद्यालयाचा रिझल्ट शे. ७५ टक्के लागला आहे. नेहमीप्रमाणें याहि वेळेस वरच्या वर्गांत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचें प्रमाण उल्लेखनीय आहे. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचीं नांवें खालीलप्रमाणें आहेतः—

पहिला वर्गः—माळी श्री. के.

दुसरा वर्गः—बेदरकर श्री. ह., बेडेकर श्री. अ., भालेराव गो. फ., चौधरी य. सि., गाडगीळ पु. कृ., कुलकर्णी कृ. ग., कुलकर्णी शां. ज., परदेशी गु. घ., पाटील ब. भ., पाटील हि. भि., साळुंखे अ. कृ., शेटे रा. अ.

तिसरा वर्गः—धांदरफळे व. दा., जोशी दि. बा., कुलकर्णी ग. वि., पाटील का. ब., पोखरकर व. उ., तायडे पं. के.

---

### पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

वरील बँकेनें अहवालाचे वर्षीं एकूण १,६०० रु. चीं २ कर्जें वाटलीं. कर्ज मागणीचे १,५७,६०० रु. चे ४४ अर्ज आले होते. खरीप व रबी ह्या दोन्ही पिकांच्या दृष्टीनें पाऊस कमी झाल्यामुळें पिकें बुडालीं व थकबाकी वाढली. प्रांतिक लँड मॉर्गेज बँकेची थकबाकी ११,९१७ रु. राहिली आहे. सभासदांस व कर्जनिवारण कायद्याखालीं दिलेल्या कर्जापैकीं १,३४,३२२ रु. रक्कम जिंदगीकडे आहे. अहवालाचे वर्षीं बँकेस २,१९१ रु. तोटा झाला.


# ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वीं आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

## पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७१८ - तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay



# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. कृ. खोले. — श्री. चं. रा. राठा.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. वा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.







हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.